जा.क्र.रजिप/शिक्षण/माध्य-४/ /२०१४
शिक्षण विभाग माध्यमिक
जिल्हा परिषद रत्नागिरी
दि.३०/१/२०१४

प्रति,

**गटशिक्षणाधिकारी,**
**पंचायत समिती (सर्व)**

**विषय - 'मित्र उपक्रम गुणवंत शाळा पुरस्कार योजना'**

**संदर्भ :- १) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०११/२९६/११/माशि-३, मंत्रालय मुंबई ४०००३२, दि. ०५/१०/ २०११.**
**२) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०११/२९६/११/माशि-३, मंत्रालय मुंबई ४०००३२, दिनांक १५ जानेवारी,२०१२**
**३) शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य यांचेकडील जा. क्र.संकीर्ण-२०१२/विपश्यना/१५क८८/६६०१/माध्यमिक व उच्च माध्यमिक, पुणे-१ दि.११/०७/२०१२**
**४) मित्र उपक्रम जिल्हास्तरीय समिती सभा दि.२१/१०/२०१३, १८/११/२०१३ व १६/१२/२०१३ मध्ये समिती अध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद,रत्नागिरी यांनी दिलेल्या सूचना.**

राज्य शासनाच्या उपरोक्त संदर्भ क्र.१, २ व ३ च्या परिपत्रकाच्या निर्देशानुसार मा.अध्यक्ष, मित्र उपक्रम जिल्हास्तरीय समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी यांचे मार्गदर्शनाखाली माहे मे २०१२ पासून रत्नागिरी जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांतील इ.५वी ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या मानसिक व बौध्दिक वाढीकरिता उपकारक ठरणाऱ्या विपश्यना आनापान साधना वर्ग तथा मित्र उपक्रम (Mind in Training for Right Awareness) अंमलबजावणी व कार्यवाही सुरु करण्यात आली.

डिसेंबर २०१३ अखेर जिल्ह्यातील ५१८ प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांनी मित्र उपक्रमांतर्गत १ दिवसीय विपश्यना साधना शिबीर प्रशिक्षण पूर्ण कले आहे. संबंधित साधनव्यक्ती शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली ३०९ जिल्हा परिषद प्राथमिक, ८ नगर परिषद प्राथमिक व १६६ खाजगी माध्यमिक अशा एकूण ४८३ शाळांत मित्र उपक्रम राबविणेत येत असून टप्याटप्प्याने जिल्ह्यातील उर्वरित सर्व शाळांत उपक्रम सुरु करण्यात येणार आहे. यामध्ये उपक्रमाची सुरुवात १० दिवसीय विपश्यना शिबीर प्रशिक्षण पूर्ण केलेल्या संबंधित साधन व्यक्ती शिक्षक, शाळेतील उर्वरित शिक्षकांचे ३ तासांचे प्रशिक्षण, तसेच इ.५वी ते १० वी मधील विद्यार्थ्यांचे आनापान प्रशिक्षण पूर्ण करुन घेतात. त्यानंतर संबंधित शाळांमध्ये शाळा भरण्यापूर्वी परिपाठाला १० मिनिटे व शाळा सुटण्यापूर्वी १० मिनिटे मित्र उपक्रमांतर्गत आनापान साधनेचा साधन व्यक्ती शिक्षक व शाळेतील उर्वरित शिक्षकांच्या मदतीने इ.५वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांचे नियमित सराव करुन घेणे बंधनकारक आहे.

जिल्ह्यामधील उपक्रम सुरु असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक, नगर परिषद प्राथमिक व खाजगी माध्यमिक शाळांकडून उपक्रम सुरु असलेबाबत तसेच उपक्रमाच्या सातत्यपूर्ण सरावामुळे विद्यार्थ्यांमध्ये होत असलेली मानसिक व बौध्दिक वाढ, विद्यार्थ्यांमध्ये होत असलेल्या सकारात्मक वर्तन बदला बाबतची माहिती मासिक अहवालातून प्राप्त होत आहे. डिसेंबर २०१२ मध्ये जिल्हास्तरावरुन मित्र उपक्रम सुरु असलेल्या व ऑक्टोबर २०१३ मध्ये मित्र उपक्रम सुरु असलेल्या व उपक्रम सुरु नसलेल्या निवडक शाळांची पर्यवेक्षकीय अधिकारी यांचेमार्फत उपक्रमाची फलनिष्पत्ती तपासण्यात आली. त्यामध्ये विद्यार्थ्यांच्या सकारात्मक वर्तन बदलाबरोबरच मुलांची एकाग्रता वाढणे, मनाची जागृतता व सतर्कता वाढणे, स्वयंशासन वृध्दिंगत होणे, स्मरणशक्ती व निर्णयक्षमता वाढणे, आत्मविश्वास वृध्दिंगत होणे, भिती, राग, चीड, उदासीनता कमी होणे, कार्यक्षमता वाढणे, अभ्यास, खेळ व अन्य सहशालेय उपक्रमात सहभाग वाढणे

इ.सकारात्मक बदल होत असल्याचे दिसून येत आहे, ज्यामधून एक आचरणशील व सुदृढ मानसिकतेच्या पिढीच्या निर्मितीसाठी हा उपक्रम सहाय्यभूत ठरणार आहे.

याकरिता ज्या शाळांमध्ये हा मित्र उपक्रम नियमितपणे राबवून आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांचा शारिरीक, मानसिक, बौध्दिक व भावनिक असा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न करीत आहेत, त्यांना अधिक प्रोत्साहन द्यावे व उर्वरित शाळांना त्यामधून प्रेरणा मिळावी यासाठी वरील संदर्भ क्र. ४ नुसार मा.अध्यक्ष, मित्र उपक्रम जिलहस्तरीय समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हा समितीने सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासून जिल्हास्तरावरुन प्रत्येक तालुक्यातील एक प्राथमिक व एक खाजगी माध्यमिक शाळेस 'मित्र उपक्रम गुणवंत शाळा पुरस्कार' देण्याचे निश्चित केले आहे.

तरी सोबत दिलेल्या निकषांच्या आधारे गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी (शिक्षण), केंद्र प्रमुख व तालुकास्तरीय समिती सदस्य यांनी मित्र उपक्रम सुरु असलेल्या शाळांना भेटी देऊन मित्र उपक्रमातून उत्कृष्ट कार्य करणाऱ्या तालुक्यातील २ प्राथमिक व २ खाजगी माध्यमिक शाळांची निवड करुन संबंधित शाळांचे प्रस्ताव आपल्या शिफारशींसह प्रमाणपत्र देऊन या कार्यालयाकडे मार्च २०१४ अखेर सादर करावेत. सदरचे प्रस्ताव दिलेल्या तारखेपर्यंत न आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील.

**'मित्र उपक्रम गुणवंत शाळा पुरस्कार' मित्र उपक्रम गुणवंत शाळा पुरस्कार' निवडीचे निकष**

१* मित्र उपक्रम सुरु असलेल्या व उपक्रम सुरु झाल्यानंतर किमान ६ महिन्यांचा कालावधी पूर्ण कलेल्या इ.५वी ते ७वीचे वर्ग असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक, नगर परिषद प्राथमिक व इ.५वी ते १०वी चे वर्ग असलेल्या खाजगी माध्यमिक शाळांना या योजनेमध्ये सहभागी होता येईल.

२) जिल्हास्तरावरुन 'मित्र उपक्रम जिल्हास्तरीय समिती' दर शैक्षणिक वर्षात तालुका स्तरावरुन आलेल्या शाळांच्या प्रस्तावामधून प्रत्येक तालुक्यातील एक प्राथमिक व एक खाजगी माध्यमिक शाळांची निवड केली जाईल.

३) शाळांची निवड करताना मित्र उपक्रमांतर्गत शिक्षक व विद्यार्थी यांचेसाठी घेण्यात आलेली कार्यशाळा, उपक्रमाचा नियमित सराव, मित्र उपक्रम शाळास्तरीय कमिटीच्या बैठका, उपक्रमातील पालकांचा सहभाग, उपक्रमाच्या नियमित सरावामुळे विद्यार्थ्यांमध्ये झालेल्या सकारात्मक वर्तन बदलांच्या व्यक्तिगत व सामूहिक स्तरावरील झालेल्या बदलांच्या - विद्यार्थी अभिप्राय व निरीक्षणात्मक नोंदी , सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनातील साधन तंत्रांमधून विद्यार्थ्यांच्या मानसिक, बौध्दिक व भावनिक नोंदी, विद्यार्थी शालेय शिस्त, परिपाठ व उपक्रम सरावातील उपस्थिती, अध्ययन व सहशालेय उपक्रमातील सहभाग, विद्यार्थी-विद्यार्थी सहसंबंध, शिक्षक-विद्यार्थी सहसंबंध, विद्यार्थी-समाज, विद्यार्थी-पालक सहसंबंध, विद्यार्थी-निसर्ग व सजीव प्राण्यांबद्दलची संवेदनशीलता, विद्यार्थ्यांच्या जीवन कौशल्याशी निगडीत कौशल्यांचा विकास इ. तसेच सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनातून विद्यार्थ्यांची होत असलेली गुणवत्तेतील वाढ, शाळेने राबविलेले विविध शैक्षणिक उपक्रम विविध स्पर्धा परीक्षेतील यश, शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रमात शाळेने मिळविलेले गुण व प्राप्त श्रेणी इ.बाबी पाहिल्या जातील.

४) पुरस्कारामध्ये स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्राचा समावेश असेल.

५) पुरस्काराचे वितरण ५ सप्टेंबर, शिक्षक दिनाच्या कार्यक्रमात करण्यात येईल.

६) एकदा 'मित्र उपक्रम गुणवंत शाळा पुरस्कार' मिळाल्यानंतर पुन्हा त्याच शाळेसाठी प्रस्ताव सादर करता येणार नाही.

मित्र उपक्रम गुणवंत शाळा पुरस्कार २०१३-१४ शाळांचे मुल्यमापन व अंतिम निवड करणेबाबतचा कार्यक्रम

१) **१५ फेब्रुवारी ते १५ मार्च २०१४:**-मित्र उपक्रम तालुकास्तरीय समितीच्या मार्गदर्शनाखाली समिती सदस्य पर्यवेक्षिकिय अधिका-यानी मित्र उपक्रम सुरु असलेल्या शाळांना भेटी देण,उपक्रमाची अंमलबजावणी कार्यवाही व फलनिष्पत्ती इत्यादी बाबत माहिती घेणे व मुल्यमापन करणे तालुकास्तरीय समितीला अहवाल सादर करणे

२) **१६ मार्च ते ३१ मार्च २०१४:-** मित्र उपक्रम तालुकास्तरीय समितीने मित्र उपक्रम उत्कृष्ट पणे राबवणा-या तालुक्यातील दोन प्राथमिक व दोन खाजगी माध्यमिक शाळांची निवड करणे,संबंधित शाळांकडूनजिल्हास्तर निवडी साठी प्रस्ताव मागून घेणे व सदरचे प्रस्ताव सदस्य सचिव मित्र उपक्रम जिल्हास्तरीय समिती तथा शिक्षणाधिकारी माध्यमिक जि.प. रत्नागिरी यांचेकडे शिफारशी सह सादर करणे.

३) **१ एप्रिल ते ३० एप्रिल २०१४:-** मित्र उपक्रम जिल्हास्तरीय समितीच्या मार्गदर्शना खाली समिती सदस्य व पर्यवेक्षकिय अधिका-यानी (जिल्हास्तर) संबंधित शाळांना भेटी देणे, प्रस्तावांची छाननी करणे व त्याचा अहवाल जिल्हा समितीला सादर करणे.

४) **१० मे २०१४ पर्यंत :-** तालुका स्तरावरुन निवड केलेल्या शाळांकडून द्वीतीय सत्र परीक्षेचा निकाल विहीत नमुन्यामध्ये घेऊन जिल्हास्तराकडे सादर करणे.(शाळामुल्यांकन गुणतक्ता क्र.१)

५) **१ जुलै ते १५ जुलै २०१४:**-मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.रत्नागिरी यांचे अध्यक्षते खाली मित्र उपक्रम जिल्हास्तरीय समितीने प्रस्ताव सादर केलेल्या संबंधीत शाळांचे मुख्याध्यापक मित्र उपक्रम साधन व्यक्ती यांची मुलाखत घेणे.

६) **३१ जुलै २०१४ पर्यंत :-** मित्र उपक्रम जिल्हास्तरीय समितीने जिल्हयातील प्रत्येक तालुक्यातील एक प्राथमिक व एक खाजगी माध्यमिक शाळेची अंतिम निवड करुन घोषीत करणे.

७) **५ सप्टेंबर २०१४ :**-जिल्हास्तरावरील ५ सप्टेंबर शिक्षक दिनाच्या कार्यक्रमामध्ये मित्र उपक्रम गुणवंत शाळां पुरस्काराचे वितरण करणे.

सदस्य
मित्र उपक्रम जिल्हास्तरीय समिती
तथा शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
जिल्हा परिषद रत्नागिरी

सदस्य सचिव
मित्र उपक्रम जिल्हास्तरीय समिती
तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक)
जिल्हा परिषद रत्नागिरी

## मित्र उपक्रम गुणवंत शाळा पुरस्कार २०१३-१४
## प्रस्तावासोबत सादर करावयाची माहिती नमुना

- अनुक्रमणिका
- प्रस्तावना

अ) १) शाळेचे नांव व पूर्ण पत्ता
   २) मुख्याध्यापकाचे नाव
   ३) मित्र उपक्रम साधन व्यक्ति शिक्षकाचे नाव
   ४) शिक्षक माहिती तक्ता (मुख्याध्यापक, पर्यवेक्षकांसह)

| अ. क्र | शिक्षकाचे नाव | पद | शिक्षण | अनोसुता | ताब्यातील वर्ग (इयत्ता) | विषय |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

५) इयत्तावार विद्यार्थी पटसंख्या

| इ.५ वी | | | इ.६ वी | | | इ. ७ वी | | | इ. ८ वी | | | इ. ९ वी | | | इ. १० वी | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

६) मित्र उपक्रम शालास्तरीय समिती सभा

| अ.क्र | सभा तारीख दरमहा एक याप्रमाणे | उपस्थित सदस्य संख्या | सभेत झालेले विषय | कार्यवाहीचे मुद्दे |
|---|---|---|---|---|
| | | | | |

७) शिक्षक व पालकांचे तीन तासांचे आनापान प्रशिक्षण

| अ क्र | प्रशिक्षण तारीख व वेळ | उपस्थिती | | | | शिक्षक व पालकांचे लेखी अभिप्राय (संख्या) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | शिक्षक | पालक/ ग्रामस्थ | इतर | एकूण | |
| १ | प्रथमसत्र | | | | | |
| २ | व्दितीय सत्र | | | | | |

(सोबत नावांसह लेखी अभिप्रायमधील महत्वाचे मुद्दे संकलित करुन जोडावे.)

८) विद्यार्थ्यांचे ७० मिनिटांचे आनापान प्रशिक्षण

| अ. क्र | प्रशिक्षण तारीख व वेळ | इयत्तावार उपस्थित विद्यार्थी संख्या | | | | | | | | | | | | | | | | | | | | | विद्यार्थ्यांचे लेखी अभिप्राय (संख्या) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | इ. ५ वी | | | इ. ६ वी | | | इ. ७ वी | | | इ. ८ वी | | | इ. ९ वी | | | इ. १० वी | | | एकूण | | | |
| | | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | |
| १ | प्रथम सत्र | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| २ | व्दितीय सत्र | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

(सोबत नावांसह लेखी अभिप्रायमधील महत्वाचे मुद्दे संकलित करुन जोडावे.)

९) मित्र उपक्रमांतर्गत आनापान सराव

| | |
|---|---|
| परिपाठच्या वेळी आनापान सराव | वेळ - |
| शाळा सुटताना आनापान सराव | वेळ - |

**ब)** १) मित्र उपक्रमांतर्गत आनापान साधनेच्या नियमित सरावाने विद्यार्थ्यांमध्ये होणाऱ्या मानसिक व बौध्दीक बदलांबाबत तसेच विद्यार्थ्यांमध्ये होणारे सकारात्मक वर्तन बदल, मनाची एकाग्रता, जागृतता, संवेदन शीलता, मनाची सतर्कता वाढणे, स्वयंशासन वृध्दींगत होणे, स्मरण शक्तितील वाढ, निर्णय क्षमता, आत्मविश्वास इ. गोष्टींतील सकारात्मक बदल तसेच मिती, राग,चीड, उदासीनता, नैराश्य, कंटाळा, व्देष, चंचलता, इ. दुर्गुण कमी होणे. विद्यार्थ्यांची अभ्यास व इतर उपक्रमामध्ये कार्यक्षमता वाढणे याबाबतीतल्या नोंदी. अभ्यासासह विद्यार्थ्यांचे खेळ व अन्य इतर उपक्रमातील सहभाग इ. मधील होणाऱ्या सकारात्मक बदलांबाबतच्या नोंदी विद्यार्थ्यांचा अध्ययनातील सहभाग, विद्यार्थी-विद्यार्थी / शिक्षक-विद्यार्थी / विद्यार्थी -समाज / विद्यार्थी - पालक सहसंबंधातील सकारात्मक बदल, निसर्ग व सजीव प्राणी या विषयाची संवेदनशीलता व मैत्रीभाव व विद्यार्थ्यांमधील मुल्यशिक्षण व जीवन कौशल्यांशी निगडित कौशल्यांचा विकास इ. बाबत शिक्षकांनी वर्षभरात वेळोवेळी विद्यार्थ्यांच्या केलेल्या निरीक्षणात्मक नोंदी, विद्यार्थ्यांकडून घेतलेले लेखी अभिप्राय तसेच शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या वर्तनात्मक बदलांचा व बोध्दीक बदलांच्या व्यक्तिगत व सामूहिक नोंदी संकलित करुन जोडाव्यात.

२) माहे ३० सप्टेंबर व ३१ मार्च च्या मासिक पत्रकानुसार इयत्तावार विद्यार्थी पटसंख्या व सरावरी उपस्थिती (दोन्ही मासिक पत्रकांच्या सत्यप्रती जोडणे.)

**क)** १) शाळा मुल्यांकन गुणतक्ता क्रमांक १ (प्रथमसत्र परीक्षा) पूर्ण भरुन जोडावा.

२) शाळा मुल्यांकन गुणतक्ता क्रमांक १ (व्दितीयसत्र परीक्षा) निरंक जोडावा.

(व्दितीय सत्र परीक्षा झाल्यावर वरील क्रमांक २ चा तक्ता १० मे २०१४ पूर्वी या कार्यालयाकडे सादर करावा.)

**ड)** शाळेला भेटी देवून मित्र उपक्रमाच्या अनुषंगाने **क्षेत्रिय अधिकारी** यांनी दिलेले शेरे/ अभिप्राय जोडावे.

**इ)** उपक्रमाच्या अनुषंगाने झालेल्या कार्यशाळा , **प्रशिक्षण** वर्गाची छायाचित्र तसेच उपक्रमाशी संबंधीत इतर उपक्रमाचे छायाचित्र **माहितीसह जोडावी.**

**ई)** समारोप

मुख्याध्यापकाचे नाव

शिक्क्यासह सही

# जिल्हा परिषद रत्नागिरी

## विपश्यना आनापान साधना वर्ग तथा मित्र उपक्रम

### 'मित्र उपक्रम गुणवंत शाळा पूरस्कार योजना' शाळा मुल्यांकन गुण तक्ता क्र.१

| अ.क्र. | शळेचे नाव | श्रेणी | इयत्ता ५वी | | | इयत्ता ६वी | | | इयत्ता ७वी | | | इयत्ता ८वी | | | इयत्ता ९वी | | | इयत्ता १०वी | | | एकूण | | | शेकडा प्रमाण | गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मुलगे | मुली | एकूण | मुलगे | मुली | एकूण | मुलगे | मुली | एकूण | मुलगे | मुली | एकूण | मुलगे | मुली | एकूण | मुलगे | मुली | एकूण | मुलगे | मुली | एकूण | | |
| | | अ | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | ब | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | क | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | ड | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | एकूण | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

| श्रेणी | |
|---|---|
| अ | ८१ ते १०० |
| ब | ६१ ते ८० |
| क | ४१ ते ६० |
| ड | ४० पेक्षा कमी |

| श्रेणी | | गुण |
|---|---|---|
| अ | ५० % पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या | २० |
| ब | ३०% पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या | १२ |
| क | २०% पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या | ८ |
| ड | - | |

(१००% विद्यार्थी अ श्रेणीत असतील तर त्यांना ४० गुण द्यावेत तसेच १००% विद्यार्थी ब श्रेणीत असतील तर २० गुण द्यावेत)

# जिल्हा परिषद रत्नागिरी

## विपश्यना आनापान साधना वर्ग तथा मित्र उपक्रम

### 'मित्र उपक्रम गुणवंत शाळा पूरस्कार योजना' शाळा मुल्यांकन गुण तक्ता क्र.२

| क्र. | शाळेचे नाव | उपक्रमासंबंधी अभिलेख (अ) २० गुण | | | | विद्यार्थ्यांमधील सदाचार व सद्वर्तनात्मक सकारात्मक बदल (ब) ४० गुण | | | | | | | | | | बौद्धिक गुणवत्ता गुण प्रथम/द्वितीय सत्र (क) ४०गुण | एकूण गुण (अ+ ब+ क ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मित्र उपक्रम शालेय समिती सभा व इतिवृत्त | शिक्षक व विद्यार्थी प्रशिक्षण वर्ग | आनापान साधना नियमित सराव | विद्यार्थी लेखी अभिप्राय व निरिक्षणात्मक नोंदी | विद्यार्थी दैनंदिन उपस्थिती | शालेय शिस्त व विद्यार्थी वर्तन बदल | विद्यार्थ्यांचा अध्ययनातील सहभाग | शिक्षक-विद्यार्थी सहसंबंध | विद्यार्थी-विद्यार्थी सहसंबंध | विद्यार्थी-समाज सहसंबंध | विद्यार्थी-पालक सहसंबंध | मुल्य शिक्षण व जिवन कौशल्यांशी निगडित कौशल्यांचा विकास | निसर्ग व सजिव प्राणी यांचे विषयीची संवेदनशिलता | सहशालेय उपक्रमातील सहभाग | | |
| | गुण | ५ | ५ | ५ | ५ | ४ | ४ | ४ | ४ | ४ | ४ | ४ | ४ | ४ | ४ | ४० | २०+४०+४०= १०० |
| | | | | | | | | | | | | | | | | | |